# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ / फाल्गुन १९, १९४४ (शके)**

**(१) उप मुख्यमंत्री**
**(२) आदिवासी विकास मंत्री** — **यांचे प्रभारी विभाग**
**(३) बंदरे आणि खनिकर्म मंत्री**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

---

## पाथरी (जि.परभणी) येथील पोलिसांनी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे उल्लंघन केलेबाबत

**(१) * १७१८६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांविरूध्द गुन्हा दाखल करतांना मा.सर्वोच्च न्यायालयाने अर्निष कुमार विरूध्द बिहार राज्य सरकारचे केस मधील निर्देशाप्रमाणे कारवाई केली नसल्याबाबत परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेकडे माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०२३ दरम्यान लेखी तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, शासकीय कर्मचाऱ्यांविरूध्द गुन्हा नोंदविण्यापूर्वी वरिष्ठ कार्यालयाची पूर्व परवानगी न घेता गुन्हा नोंदविला आहे असेही त्या तक्रारीत म्हटलेले आहे काय,
(३) असल्यास, लेखी तक्रारीत नमूद केलेल्या विविध मुद्दयांची मा.मुख्य सचिव यांच्याकडून सविस्तर चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे उल्लंघन करून वरिष्ठांची पूर्व परवानगी न घेणाऱ्या परभणी पोलिसांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे याबाबत थोडक्यात माहिती काय आहे,
(५) नसल्यास, या प्रकरणी पोलिसांना पाठीशी घालण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) फिर्यादी अजिम अजिस तांबोळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नविन आठवडी बाजारात बसण्यासाठी दरमहा ५,०००/- रुपये खंडणी न दिल्यास भाजीपाला विकता येणार नाही अशी धमकी दिल्यामुळे तसेच, शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे शासकीय कर्मचारी यांच्याविरुध्द खंडणी वसूल

केल्याबाबत पोलीस स्टेशन पाथरी येथे गु.र.नं.४९०/२०२२ कलम ३८४, ५०४, ५०६, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हा दाखल करतांना वरिष्ठ कार्यालयाच्या पूर्व परवानगीची आवश्यकता नाही. तपासाअंती मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सद्य:स्थितीत गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(३), (४) व (५) शासन स्तरावर याबाबत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## आमलीबारी (जि.नंदुरबार) धरणाची दुरूस्तीची कामे करण्याबाबत

**(२) * १७६२४ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा (जि.नंदुरबार) येथील सरदार सरोवर प्रकल्पामुळे बाधित झालेल्या ग्रामस्थांचे पुनर्वसन करण्यासाठी वसविलेल्या देवमोगरा गावाला पाणीपुरवठा करण्याकरीता बांधण्यात आलेले आमलीबारी धरण तांत्रिक चुकीमुळे सन २००६ मध्ये फुटले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धरण फुटून १६ वर्षांचा कालावधी उलटून गेला तरीही अद्याप त्याची दुरुस्ती अथवा याप्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आमलीबारी धरणाची दुरुस्तीची कामे तातडीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सदर धरणाशी संबंधित तत्कालीन अधीक्षक अभियंता, घाटघर जलविद्युत मंडळ, नाशिक यांचेमार्फत अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे. सदर अहवालाप्रमाणे योजनेचे माती धरणाला कोणतेही नुकसान पोहोचले नसून अतिवृष्टीमुळे सांडवा क्षतीग्रस्त झाल्याचे नमूद आहे.

आमलीबारी योजनेच्या नव्याने धरण व कालव्याची उर्वरीत कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊन पूर्ण करण्याऐवजी यास पर्याय म्हणून गुजरात राज्याशी झालेल्या नर्मदा खोरे पाणीवाटप करारानुसार उकाई धरणाच्या फुगवटातून मौजे आमलीबारी (देवमोगरा) येथील प्रस्तावित ३८५ हे. क्षेत्रास सिंचनाची सुविधा देण्यासाठी स्वतंत्र उपसा सिंचन योजना प्रस्तावित करण्यात यावी अशा सूचना तत्कालीन मंत्री (जलसंपदा) यांच्या दिनांक ०४/०२/२०१५ च्या बैठकी दरम्यान देण्यात आल्या होत्या. त्यानुसार उपसा सिंचन योजनांच्या सर्वेक्षणाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रगतीत आहे.

(४) उकई धरणाच्या फुगवट्यातून पाणी उचलण्याच्या सर्व्हेक्षण प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीत आहे.

-----------------

## राज्यातील आदिवासी विभागाच्या आश्रम शाळांकरीता अन्नधान्य खरेदीच्या निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(३) * १७७७९ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाचे निर्बंध हटविण्यात आले असूनही आदिवासी विभागाच्या आयुक्त स्तरावर होणाऱ्या अन्नधान्य खरेदीच्या १२० कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याने आदिवासी आश्रम शाळांतील विद्यार्थ्यांवर उपासमारीचे संकट ओढविले असल्याची बाब माहे डिसेंबर,२०२२ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाअंतर्गत शासकीय आश्रमशाळांना पोषण आहारासाठी अन्नधान्य पुरवठा करणेबाबत आयुक्त स्तरावरून निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असून ही प्रक्रिया पूर्ण न झाल्याने सुरगाणा तालुक्यातील निमशासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळेत अन्नधान्य पुरवठा उपलब्ध न झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विकास विभागाअंतर्गत ४९९ शासकीय आश्रमशाळा सुरू असून यात १ लक्ष ९७ हजार ८७२ विद्यार्थी शिक्षण घेत असून ३०० हून अधिक आश्रमशाळा विविध दुर्गम भागात सुरू आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक शाळेत जेवणासाठी तांदूळ नसल्याने विद्यार्थ्यांची उपासमार होण्याची शक्यता निर्माण झाली असून सदर प्रकरणी या शाळांतील विद्यार्थ्यांना तात्काळ अन्नधान्य देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) विभागांतर्गत ४९९ शासकीय आश्रमशाळा असून या शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना भोजनासाठी लागणारे अन्नधान्य, कडधान्य, किराणा माल व मसाले पदार्थ पुरवठा करणेसाठी आयुक्तालयाचे स्तरावरुन ई-निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही सुरु असून ती अंतिम टप्प्यात आहे.

शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची भोजनापासून गैरसोय होऊ नये या दृष्टीने दिनांक २२/०५/२००६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तातडीची बाब म्हणुन सात दिवस पुरेल एवढे धान्याची खरेदी सदर निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शाळास्तरावर करुन पुरवठा करणेबाबत आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांच्या स्तरावरुन दिनांक ०५/०७/२०२२ अन्वये सर्व प्रकल्प अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार प्रकल्प अधिकारी/मुख्याध्यापक यांचे स्तरावर अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची उपासमार होत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पलाटपाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील आदिवासी नागरिक मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(४) * १७३१२ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील गणेशपुरी ग्रामपंचायत हद्दीतील उसगाव येथे धरणाच्या किनाऱ्यावर असलेल्या पलाटपाडा या ३० आदिवासींच्या घरांची लोकवस्ती असलेल्या गावात वर्षानुवर्षे राहत असलेल्या आदिवासी सोयी-सुविधांपासून वंचित असल्याबाबत तेथील ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, मा.मंत्री, आदिवासी विकास, सचिव, आदिवासी विकास विभाग, जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गणेशपुरी ग्रामपंचायत हद्दीतील पलाटपाडा या गावात मूलभूत सोयी-सुविधांची विकास कामे, बांधकामे करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) उसगाव पलाटपाडा हा ग्रामपंचायत गणेशपूरी, ता.भिवंडी अंतर्गत येतो. सदर पाड्यात ३४ घरे असून त्यापैकी २४ कुटूंबाची घरे उसगाव व पलाटपाडा या दोन्ही ठिकाणी असून सदर कुटुंबे ही उसगाव व पलाटपाडा या ठिकाणी आलटून पालटून वास्तव्य करत असतात तर केवळ १० कुटुंबच पलाटपाडा येथे कायमस्वरूपी वास्तव्यास आहेत. सदर पाड्याला मुख्य रस्त्यास जोडण्यासाठी पक्का रस्ता जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित आहे. पाड्यावर विहीरींद्वारे पाणी पुरवठ्याची सुविधा उपलब्ध आहे. सदर पाड्यावरील मुले अंगणवाडी केंद्र उसगाव अंतर्गत समाविष्ट असून सदर पाड्याकरीता मिनी अंगणवाडी केंद्र महीला व बालविकास विभागामार्फत प्रस्तावित आहे. पाड्यावरील विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणाची (इ. १ ली ते ४ थी) सुविधा जिल्हा परिषद शाळा उसगाव येथे उपलब्ध आहे. आरोग्य उपकेंद्र उसगाव येथील कर्मचाऱ्यांकडून आरोग्याच्या सुविधा पुरविण्यात येत आहेत.

-----------------

## मालेगाव (जि.वाशिम) येथील बेरोजगार युवकांना नोकरीचे आमिष दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(५) * १७५०४ श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.वाशिम) येथील बेरोजगार युवकांना नोकरीचे आमिष दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा प्रकार दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

मालेगाव, जि.वाशिम येथील बेरोजगार युवकांना नोकरीचे आमिष दाखवून पैसे घेतल्याची व सदर पैसे परत न केल्याची बाब जून, २०२१ मध्ये निदर्शनास आली आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी आरोपीत व त्याचे साथीदार यांनी संगनमत करून बेरोजगार लोकांना विविध खात्यात नोकरी लावून देतो असे आमिष दाखवून तक्रारदार व साक्षीदारांकडून अंदाजे ३५ लाख रुपये घेऊन त्यांना नोकरी लागल्याच्या बनावट ऑर्डर देऊन त्यांची फसवणूक केली असल्याचे चौकशी दरम्यान निष्पन्न झाल्याने दिनांक १९/०९/२०२१ रोजी आरोपितांविरुध्द पो.स्टे. मालेगाव येथे अपराध क्रमांक ४०५/२०२१ कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ भारतीय दंड विधान अन्वये गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणी ९ आरोपींना अटक करण्यात आले असून गुन्ह्याचा तपास सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पोलीस पाटील यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत.

**(६) * १७८०८ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गावपातळीवर कार्यरत पोलीस पाटील यांच्या मागण्या शासनाकडे प्रलंबित असून त्यात प्रामुख्याने ग्राम पोलीस पाटील अधि.१९६७ मध्ये दुरुस्ती करणे, किमान वेतन, अनुकंपा तत्त्वावर वारसांना नियुक्ती, निवृत्तीचे वय ६५ करणे, सेवानिवृत्तीनंतर २० लाख रुपये रोख रक्कम मिळावी, गृह व महसूल भरतीत ५ टक्के व इतर मागण्यांसाठी नागपूर येथील हिवाळी अधिवेशन २०२२ दरम्यान आंदोलने करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता, हे खरे आहे काय
(२) असल्यास, या मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, यासाठी सदर कर्मचारी शासनासोबत बैठका, अर्ज, विनंत्या, आंदोलने करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर शासनाने निर्णय घेण्याबाबत व राज्यातील पोलीस पाटीलांच्या समस्या सोडविण्याबाबत तसेच त्यांचे मानधन वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) पोलीस पाटलांच्या विविध मागण्यांबाबत शासनाने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

- शासन निर्णय दिनांक ०८/०३/२०१९ अन्वये महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील अधिनियम, १९६७ मध्ये आवश्यकते नुसार सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर अधिनियम, १९६७ मध्ये आवश्यक सुधारणा करण्याकरीता शासन स्तरावर समितीचे गठन करण्यात आले असून याबाबत कार्यवाही सुरु आहे.
- राज्यातील पोलीस पाटील यांचे मानधन रुपये ३,००० वरून रुपये ६,५०० इतकी वाढ करण्यास शासन निर्णय दिनांक ०८/०३/२०१९ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.
- महसूल व वन विभाग शासनपत्र दिनांक ०२/०८/२०२२ अन्वये पोलीस पाटील यांच्या नियुक्तीच्या नुतनीकरणासाठी आवश्यक दाखले यांची पूर्तता करताच नुतनीकरण प्रक्रिया वेळेत व्हावी याकरीता सर्व जिल्हाधिकारी/ उपविभागीय अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
- पोलीस पाटील राज्यपाल पुरस्कार नियमित देण्याकरीता प्रत्येक जिल्ह्यातून प्रतिवर्षी एका पोलीस पाटलांची निवड करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्यास्तरावर विकेंद्रीकृत जिल्हा निवड समिती गठीत करण्यात आली असून त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.
- कोविड-१९ कर्तव्य बजावत असताना कोरोना संसर्गाने मृत्यू झाल्यास वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २९/०५/२०२०, दिनांक १४/१०/२०२० व दिनांक १४/०५/२०२१ नुसार रुपये ५० लक्ष सानुग्रह साहाय्य मयत पोलीस पाटलांच्या कुटूंबियांना सानुग्रह सहाय्य देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वस्त्रोद्योग सवलतीपासून वंचित असलेबाबत

**(७) * १७५९१ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने वस्त्रोद्योगांना थकीत वीज देयकात सवलत देण्यास सुरुवात केली असून, सदर सवलतीपोटी महावितरणला १०० कोटी रुपये अदा केले आहेत, परंतु महावितरणने केवळ मोजक्याच वस्त्रोद्योगांना सवलत दिली असून राज्यातील बहुतांश वस्त्रोद्योग सवलतीपासून वंचित आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अपुरे मनुष्यबळ वाढते विजेचे दर, महागाई यामुळे अडचणीत असलेल्या तसेच सवलती पासून वंचित असलेल्या वस्त्रोद्योगांना वीज देयकात सवलत मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) " वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३" अंतर्गत शासन निर्णयानुसार दिनांक २१/१२/२०१८ मधील तरतूदीनुसार वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या निर्देशानुसार वस्त्रोद्योग आयुक्तालयाकडे स्वयं घोषणापत्र सादर न केलेल्या सुमारे ७८६ वस्त्रोद्योग घटकांच्या सवलत माहे फेब्रुवारी, २०२१ व डिसेंबर, २०२१ पासून स्थागित करण्यात आली होती. यापैकी वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या निर्देशानुसार ११६ वस्त्रोद्योग घटकांची सवलत पूर्ववत करण्यात आली आहे. सवलत स्थगित केलेल्या महिन्यांपासून ते

पूर्ववत केलेल्या महिन्यापर्यंतचा परतावा रुपये २०९.७९ कोटी पैकी ५०% रक्कम संबंधित वस्त्रोद्योग ग्राहकांच्या जानेवारी, २०२३ च्या वीज देयकात वळती करण्यात आली आहे. उर्वरित ५०% रक्कम पुढील देयकामध्ये वळती करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वरळी, नायगाव, ना. म. जोशी मार्ग व शिवडी येथील बीडीडी चाळ पुनर्विकास योजनेमध्ये व्यावसायिकांना गाळे देण्याबाबत

**(८) * १७५९५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सचिन अहिर : तारांकित प्रश्न क्रमांक १५३०१ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील नायगाव, वरळी, ना. म. जोशी मार्ग या ठिकाणच्या बीडीडी चाळींचा पुनर्विकास करून येथील रहिवाशांचे पुनर्वसन करण्यासाठी करण्यात आलेल्या मुंबईच्या विकास नियंत्रण व प्रवर्तन नियमावलीच्या (डीसीपीआर) ३३ (९)(बी) तरतुदी अंतर्गत निवासी भाडेकरूंना १६० चौरस फुटाऐवजी ५०० चौरस फुट क्षेत्रफळ जागा देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सरकारची परवानगी घेवून अनिवासी परवाना घेणाऱ्या गाळेधारकांना/ व्यावसायिक दुकानदारांनाही १६० चौरस फुट क्षेत्रफळाची जागा देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तरतूद भेदभावपूर्ण व अन्यायकारक असल्याने बीडीडी चाळ दुकानदार संघाने विरोध दर्शविल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बीडीडी चाळींच्या प्रस्तावित पुनर्विकास योजनेत क्षेत्रफळ वाटपावरून निवासी आणि अनिवासी भाडेकरूंमध्ये अन्यायकारक दुजाभाव करण्यात आला असल्याने दुकानदार आणि गाळेधारकांत नाराजीची भावना पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बीडीडी चाळीतील अनिवासी भाडेकरूंना देखील निवासी भाडेकरूंप्रमाणे ५०० चौ. फूट क्षेत्रफळ जागेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणता सकारात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३(९)(ब) च्या विनियम ३(ii) अनुसार, बी.डी.डी. चाळीतील अनिवासी गाळे धारकाकडे जेवढे क्षेत्र आहे तेवढेच क्षेत्र म्हणजे पुनर्विकासानंतर १६० चौ. फूट चटई क्षेत्रफळाचा अनिवासी गाळा अनुज्ञेय ठरतो.
(३), (४) व (५) बीडीडी चाळ पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावलीत अंतर्भूत केलेली विनियम ३३(९)(ब) ची तरतूद ही विहीत प्रक्रियेचा अवलंब करुन अंतिम करण्यात आली आहे.

कोणत्याही विकास नियंत्रण विनियमानुसार पुनर्विकास करतांना निवासी व अनिवासी (व्यावसायिक) क्षेत्र स्वतंत्र गणले जाते.

बीडीडी चाळ दुकानदार संघ यांनी याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. मा.उच्च न्यायालयातील सदरचे प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## राज्यातील पूर्णा नदीच्या खोऱ्यामधील खाऱ्या पाण्याच्या पट्ट्यामुळे कृषी क्षेत्र बाधित होत असल्याबाबत

**(९) * १७२७९ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अमरावती, अकोला, बुलढाणा या जिल्ह्यातून वाहणाऱ्या पूर्णा नदीच्या खोऱ्यामध्ये खाऱ्या पाण्याच्या पट्ट्यामुळे कृषी क्षेत्र बाधित होत असल्याने यापूर्वी डिससॅलीनेशन अर्थात खारे पाणी काढण्यासाठी जो प्रकल्प राबविण्यात आला तो यशस्वी झाला नाही,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदूरा तालुक्यामध्ये पूर्णा नदीवर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्या अंतर्गत जीगाव प्रकल्प उभारला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकल्पामुळे जवळपास ४५ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे याबाबत घोषणा करूनही या प्रकल्पाचे अद्याप काम सुरू झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हा प्रकल्प सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रश्नात नमूद केलेला प्रकल्प जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात आलेला नसून, कृषी विभागाकडून प्राप्त अभिप्रायानुसार सदर विभागाकडूनही असा प्रकल्प राबविण्यात आलेला नाही.

(२) हे खरे आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यामध्ये तापी खोऱ्यातील पूर्णा नदीवर जिगांव प्रकल्पाचे काम प्रगती पथावर आहे.

(३) हे खरे नाही.

सदर प्रकल्पांतर्गत भूसंपादन, पुनर्वसन, उपसा सिंचन योजना तसेच माती धरणाची बहुतांश कामे प्रगती पथावर आहेत.

(४) प्रकल्पाच्या एकूण १५ उपसा सिंचन योजनेपैकी मंजूर नियोजनानुसार प्रथम टप्प्यातील १२ उपसा सिंचन योजनेची स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत विभागाची ९० टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. सदरचा प्रकल्प बळीराजा जलसंजीवनी योजनेंतर्गत अर्थसहाय्यीत असून या प्रकल्पाचे टप्पानिहाय नियोजन केले आहे. प्रथम टप्प्यानुसार अंशत: पाणीसाठा करुन ४५००० हे. क्षेत्रावर बंदिस्त नलिका वितरण प्रणालीची कामे हाती घेण्याचे प्रस्तावित आहेत.

प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात बाधित होणाऱ्या एकूण ४७ गावांपैकी मंजूर टप्पा निहाय नियोजनानुसार प्रथम टप्प्यामध्ये २५ गावांचे पुनर्वसन व अंशत: पाणीसाठा निर्मितीसाठी आवश्यक भूसंपादन करण्याचे काम प्रगतीत असून टप्पानिहाय नियोजनानुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भोकरबारी (ता.पारोळा, जि.जळगाव) धरणाचे पुनर्भरण नदीजोड प्रकल्पांतर्गत करणेबाबत

**(१०) * १७६५५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकरबारी (ता.पारोळा,जि.जळगाव) धरण नदीजोड प्रकल्पांतर्गत गिरणा धरणाच्या विसर्गाने पुनर्भरण करणेबाबतचे निवेदन वंजारी बोदडे ग्रुप ग्रामपंचायतीने जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू धरणाचे पुनर्भरण नदीजोड प्रकल्पांतर्गत करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त धरणाचे पुनर्भरण नदीजोड प्रकल्पांतर्गत करणेबाबतचा प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंत्रालयात बोगस लिपिक भरतीच्या नियुक्त्या देऊन फसवणूक केल्याबाबत

**(११) * १७०२९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंत्रालयात सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी तसेच कार्यालयीन कामकाज आटोपल्यानंतर बोगस लिपिक भरतीच्या मुलाखती घेऊन बोगस नोकर भरती मध्ये जवळपास १२-१५ बेरोजगार तरुणांची फसवणूक झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंत्रालयात शिपाई पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याने इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मंत्र्यांच्या वाहनासाठी जारी करण्यात आलेल्या प्रवेशिकेचा व मंत्रालयातील १२ हून अधिक निवृत्त कर्मचाऱ्यांच्या नावे बनविलेल्या बनावट ओळखपत्रावर मंत्रालयात प्रवेश केल्याने मंत्रालयीन सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मंत्रालयातील उपसचिवांच्या केबिनमध्ये बोगस मुलाखती व नियुक्ती देऊन १२-१५ बेरोजगार तरुणांची जवळपास एक कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली असल्याने संबंधितांना न्याय देण्याकरीता जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) वाहनासाठी वापरण्यात आलेल्या प्रवेशिकेचा वापर करण्यात आला नसून, मंत्रालयातील तीन निवृत्त कर्मचाऱ्यांच्या नावे बनविलेल्या बनावट ओळखपत्रावर मंत्रालयात प्रवेश घेतला असल्याचे तपासात आढळून आले आहे.
(३) सदर प्रकरणी सात जणांविरुध्द गु.प्र.शा. गु.र.क्र.३१६/२०२२ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, १७०, १२० बी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्याच्या तपासात एकूण ३४ बेरोजगार तरुणांची फसवणूक झाली असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरणात एकूण सात जणांना अटक करण्यात आली असून त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे काळी दौलत (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथे पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव प्रलंबित असलेबाबत

**(१२)** * **१७४७७ श्री.निलय नाईक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे काळी दौलत (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथे पोलीस ठाणे निर्माण करणे बाबतचा प्रस्ताव शासन दरबारी दीर्घकाळ प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे काळी दौलत येथील लोकसंख्या पाहता तेथे एक पोलीस ठाणे असणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावाबाबत कोणत्या प्रकारची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मौजे काळी दौलत (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथे पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिनांक १६/३/२०२२ रोजी पोलीस उप महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांना सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात त्यांनी काही त्रुटींची पुर्तता करणेबाबत पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांना दिनांक १८/५/२०२२ च्या पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.

म्हणून, उपरोक्त प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत शासनास प्राप्त करून नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोसीखुर्द प्रकल्पाच्या बॅकवॉटर मुळे प्रभावित झालेल्या गावांचे पुनर्वसन करणेबाबत

**(१३) * १६९७१ श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक १२३८० ला दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द प्रकल्पाच्या बॅकवॉटर मुळे प्रभावित असलेल्या कुही तालुक्यातील ६ गांवे तथा भिवापूर तालुक्यातील ३ गावांचे पुनर्वसन करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात कुही तालुक्यातील मौजा रूयाड, चिचघाट, कुजबा, आवरमारा, आमटी, टेकेपार व भिवापूर तालुक्यातील चिखलापार, मांगली (जगताप), कोलारी या गावाचे पुनर्वसन करणे गरजेचे असून गोसीखुर्दच्या बॅकवॉटर मुळे या गावात पुराची परिस्थिती निर्माण होऊन जिवीत व वित्तहानी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्व गावांचे पुनर्वसन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नात नमूद गावांपैकी, तालुका कुही येथील मौजा चिचघाट- ५८, कुजबा, आवरमारा, आमटी ही गांवे गोसीखुर्द प्रकल्पाच्या पार्श्वजलामुळे (Back water) अंशत: प्रभावित होत असून सदर गावातील जमीन ७५ टक्के पेक्षा कमी बाधित होत असल्याने पुनर्वसन कायद्याचे तरतुदीत मोडत नाही.

गोसीखुर्द प्रकल्पात पार्श्वजलामुळे (Back water) मौजा रुयाड व टेकेपार ही गावे पूर्णत: बाधित होत असून सदर गावाचे पुनर्वसन कायदा १९९९ अन्वये पर्यायी गावठाण मौजा चिरव्हा व रुयाड येथे पुनर्वसन करण्यात येत आहे.

ता.भिवापूर येथील मौजा चिखलापार, मांगली (जगताप), कोलारी ही गावे प्रकल्पाच्या पार्श्वजलामुळे प्रभावित होत नाहीत.

(३) कुही तालुक्यातील मौजा चिचघाट, कुजबा, आवरमारा, टेकेपार व भिवापूर तालुक्यातील चिखलापार, मांगली (जगताप), या पूरग्रस्त व प्रकल्पबाधित गावानां जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिनांक ७/१०/२०२२ रोजी भेट दिली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिनांक १८/१०/२०२२ च्या पत्रान्वये भेटीदरम्यान आलेल्या समस्येबाबत महसूल यंत्रणेला आवश्यक ते निर्देश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी शहरात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरे उपलब्ध करून देण्याच्या प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१४) * १६९९२ श्री.जयंत पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील पोगाव येथील सुमारे २५ एकर आरक्षित भूखंडावर पायाभूत सुविधांसह प्रधानमंत्री आवास योजनेतून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील कुटुंबियांना १० लाख ६४ हजार रुपयांत घरे उपलब्ध करून देणारा प्रकल्प सन, २०१९ मध्ये सुरू झाला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहमदाबाद येथील मे.पीएसपी प्रोजेक्ट लिमिटेड या कंपनीने प्रकल्प दराच्या कमी किंमतीत अर्थातच ६७३ कोटी रुपयांमध्ये दोन लाख ६६ हजार ८२७ चौरस मीटर क्षेत्रफळाचे बांधकाम करून देण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून सदर ठेकेदारास कार्यादेश देण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पामध्ये एकूण ६०६० घरे तर ११२ दुकानांचे गाळे बनवून दिले जाणार असून राज्य शासनाने या प्रकल्पास मंजुरी देत असताना एकूण प्रकल्प बांधकामाच्या क्षेत्रफळापैकी पाच टक्के वाणिज्य बांधकाम ठेकेदाराने महानगर पालिकेस विना मोबदला देण्याचं निश्चित झाले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दिनांक २६ जून, २०१९ रोजीच्या प्रकल्प कार्यादेशात सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ३६ महिन्यांचा कालावधी दिला असून साडेतीन वर्षांहून अधिक कालावधी उलटून गेला तरी ठेकेदाराने काम सुरु केले नसल्यामुळे सदरचे काम आता म्हाडाकडून करून घेण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ३६ महिन्यांचा कालावधी संपूनही सदर प्रकल्पाच्या कामास सुरुवात न करणाऱ्या ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर प्रकल्पाचे काम म्हाडाकडून सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे व ह्या प्रकल्पाचे काम केव्हांपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) भिंवडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात मौजे चविंद्रा/ पोगांव येथे महानगरपालिकेच्या १०.७६ हेक्टर जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ६३४८ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (EWS) घरकुलांना मंजूरी देण्यात आली आहे.

भिंवडी निजामपूर शहर महानगरपालिकेने निविदा प्रक्रियेअंती पी.एस.पी. प्रोजेक्ट लिमिटेड या कंपनीला रुपये ६७३.५६ कोटींची निविदा मंजूर करुन त्यांना कार्यारंभ आदेश दिले आहेत. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठीच्या (EWS) सदनिकांची किंमत रुपये १०.६१ लक्ष प्रति सदनिका इतकी आहे.
(३) होय.
(४) सदर प्रकल्प म्हाडा प्राधिकरणाने हाती घेण्याबाबत नगरविकास विभागाने दिनांक ०२/१२/२०२२ अन्वये शासन निर्णय निर्गमित केला आहे.
(५) नगरविकास विभागाच्या दिनांक २/१२/२०२२ च्या शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी सदर जमीन म्हाडा प्राधिकरणाच्या नावाने करण्याबाबत तसेच सदर प्रकरणी न्यायालयीन प्रकरण असल्यास त्याचा आढावा घेऊन महानगरपालिकेने केंद्रीय संनियंत्रण समितीस (CSMC) सादर केलेल्या प्रकल्प अहवालामध्ये आवश्यक तो बदल करुन पुन्हा नविन आराखड्यानुसार केंद्रीय संनियंत्रण समितीच्या (CSMC) मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही विचाराधीन आहे.

-----------------

## भोर (जि.पुणे) येथील शहर पोलीस ठाण्याच्या आवारातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१५) * १७५५८ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) येथील शहर पोलीस ठाण्याच्या आवारात असलेली ३२ वर्षांपूर्वी बांधलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासामधील दारे तुटलेली, तर कांही ठिकाणी खिडक्या पडलेल्या, कौले फुटलेली असून आजुबाजूला झाडे गवत वाढलेले असून या गैरसोयीमध्ये पोलीस वास्तव्य करीत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस कर्मचाऱ्यांनी नवीन वसाहत बांधावी किंवा दुरुस्ती करुन देण्याची मागणी संबंधितांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधीची तरतूद करुन पोलीस कर्मचाऱ्यांना नवीन वसाहत बांधून देण्याबाबत किंवा दुरुस्ती करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

जिल्हा पोलीस दल पुणे ग्रामीण घटक कार्यालयाच्या अधिपत्याखालील भोर पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरीता सन १९७५ साली बांधकाम करण्यात आलेली पोलीस अधिकाऱ्यांकरीता ३ निवासस्थाने व पोलीस अंमलदाराकरीता ४० निवासस्थाने अशी एकूण ४३ शासकीय निवासस्थाने आहेत.

यापैकी दुरुस्त केलेल्या ६ निवासस्थानांमध्ये पोलीस अंमलदार राहावयास असून उर्वरीत पोलीस अधिकारी व अंमलदारांची निवासस्थाने राहण्यायोग्य नसल्याने रिक्त आहेत.

(३) व (४) भोर पोलीस ठाण्याकरीता असलेली शासकीय निवासस्थाने अत्यंत जून्या कालावधीतील वापरण्यास अयोग्य व असुरक्षीत असल्याने ती निवासस्थाने पाडून पोलीस अधिकारी यांचेकरीता ४ व अंमलदार यांचेकरीता ३० निवासस्थाने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांचेमार्फत बांधून मिळणेबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामिण यांनी दिनांक १८/०३/२०२१ अन्वये सादर केला आहे.

पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दिनांक १४/०६/२०२१ अन्वये महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांना भोर पोलीस ठाण्याकरीता उपरोक्त एकूण ३४ शासकीय निवासस्थाने प्रथम प्राधान्याने बांधणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकामास प्राधान्यक्रम ठरवून दिनांक ०७/०२/२०२३ पत्रान्वये सदर प्राधान्यक्रम यादीस मान्यता दिलेली आहे. सदर प्राधान्यक्रम यादीमध्ये भोर पोलीस स्थानकामध्ये असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचे ३४ निवासस्थान बांधकामाचा समावेश आहे.

निधी उपलब्धतेनंतर पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांचेकडून करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिन्नर-शिर्डी महामार्गावर खाजगी बसला झालेल्या अपघाताची चौकशी करण्याबाबत

**(१६) * १७९२४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर-शिर्डी महामार्गावरील पाथरे शिवारात खाजगी आरामबस व माल मोटार यांच्यात टक्कर होऊन झालेल्या अपघातात १० जण ठार व ३० जण गंभीररित्या जखमी झाले असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपघातात मृत्यू पावलेल्यांच्या कुटूंबियांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर करुन जखमींवर शासकीय स्वखर्चाने उपचार करण्यात येतील असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर करुन तसेच सदरचा अपघात नेमका कशामुळे झाला याची चौकशी करुन अहवाल शासनास सादर करावा असे विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकारी, नाशिक यांना मा.मुख्यमंत्री महोदयांनी आदेशित केले असल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, असे असताना, अपघात होऊन चार दिवस उलटूनही जखमींच्या उपचारासाठी शासन निधीतून अद्याप मदत करण्यात आली नसल्याचे व त्यामुळे शस्त्रक्रिया रखडल्या असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केलेले व मा.पंतप्रधान निधीतून २ लाख रुपयांचा निधी तसेच अपघातात मृत्यू पावलेल्यांच्या कुटूंबियांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत व जखमींवरील औषधोपचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

सदर अपघात बाबतीत दिनांक १३/०१/२०२३ रोजी भा.द.वी. कलम २७९,३०४ (अ), ३३७, ३३८,४२७, सह मो.वा.का.१८७, १३४/ १७७ अन्वये वावी पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा तपासाधीन आहे.

सदर अपघातात मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत मंजूर केली आहे. तसेच जखमींवर शासकीय खर्चाने उपचार करण्यात आले आहेत.
(३) अपघातातील जखमींवर वेळेवर औषधोपचार व शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

(४) सदर अपघातात मृत्यू पावलेल्यांच्या कुंटुबियांना प्रत्येकी ५ लाख रुपये आर्थिक मदत सिन्नर तहसिल कार्यालयाकडून वितरीत करण्यात आली असून अपघातातील जखमींवरील औषधोपचार व शस्त्रक्रिया करीता २० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. तसेच मा.पंतप्रधान निधीची रक्कम प्राप्त होताच संबंधितास वितरीत करण्याची तजवीज ठेवली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रभादेवी (मुंबई) येथे गणपती विसर्जनावेळी केलेल्या गोळीबार प्रकरणी दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत

**(१७) * १८०६८ श्री.अंबादास दानवे, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १६१७४ ला दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील प्रभादेवीमध्ये सन २०२२ च्या गणेश विसर्जनाच्या वेळी झालेल्या गोळीबारात घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेले काडतूस व लोकप्रतिनिधीच्या जप्त करण्यात आलेल्या बंदुकीबाबतचा कलिना येथील न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा बॅलेस्टिक अहवाल दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालात घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेले काडतूस हे लोकप्रतिनिधींच्या बंदुकीतुन सुटल्याचे सिध्द झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेला तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होवूनही पोलिसांकडून सी.सी.टि.व्ही. फुटेज तपासण्यात आले आहे काय, फुटेज आधारावर किती प्रत्यक्षदर्शी यांचे जबाब नोंदविण्यात आले, नोंदविण्यात आलेल्या जबाबाच्या अनुषंगाने संबंधित गुन्ह्यांबाबत कोणती कलमे लावण्यात आली, कलमे लावण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित लोकप्रतिनिधींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी मा.उपमुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी पत्राद्वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कलिना येथील न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या प्राप्त झालेल्या बॅलेस्टिक अहवालानुसार शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने संबंधित लोकप्रतिनिधींवर गुन्हा दाखल करुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) उक्त प्रकरणी न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा बॅलेस्टिक अहवाल दिनांक २८/०९/२०२२ रोजी दादर पोलीस ठाणेस प्राप्त झाला आहे.
(२) घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेले काडतूस हे लोकप्रतिनिधीच्या बंदुकीतून सुटले असले तरी सदर काडतुस अन्य व्यक्तीकडून फायर झाले आहे.

(३), (४) व (५) उक्त प्रकरणी सी.सी.टि.व्हि. फुटेज तपासण्यात आले असून त्या आधारे १४ साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. सदर जबाबाच्या अनुषंगाने, शासकीय कामात अडथळा आणणे तसेच, अग्निशस्त्र निष्काळजीपणे हाताळून स्वत:च्या व इतरांच्या जिवितास हानी पोहोचेल असे कृत्य केल्यामुळे संबंधित लोकप्रतिनिधी व इतर ९ जणांवर दादर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.नं.५७१/२०२२ कलम १४३, १४४, १४५, १४७, १४८, १४९, ३३६, १८६, ५०४, ५०६ भा.दं.वि.सह कलम ३, २५ भारतीय हत्यार कायदा सह कलम ३७(१), १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सद्य:स्थितीत गुन्ह्याचा तपास चालू आहे.

-----------------

## लोअर परळ (मुंबई) येथील ''क्रिसेंटबे'' गृह प्रकल्पातील जीएसटी रकमेचा भरणा शासनाकडे केलेला नसल्याबाबत

**(१८) * १८०६९ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई लोअर परळ येथील ''क्रिसेंटबे'' या गृह प्रकल्पातील घरांची विक्री करुन ३०.७६ कोटी रुपयांचा जी.एस.टी.विकासकाकडून शासनाकडे भरला गेला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास,केलेल्या कारवाईचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सदर विकासकाने दाखल केलेल्या विवरणपत्रानुसार १ जुलै, २०१७ ते जानेवारी, २०२३ पर्यंतच्या कालावधीतील घर/ सदनिका विक्रिशी संबंधित संपूर्ण जीएसटी कराचा भरणा शासनाकडे केलेला आहे.

परंतू, मुंबई लोअर परळ येथील "क्रिसेंटबे" या गृह प्रकल्पाच्या विकासकाला राष्ट्रीय नफाखोरीविरोधी प्राधिकरण यांनी केस नं.५१/२०२२ मध्ये दिनांक २९/०७/२०२२ रोजी आदेश पारित करून, संबंधित विकासकास या प्रकल्पातील फ्लॅट धारकास इनपुट टॅक्स क्रेडीट चा ३०.७६ कोटी रुपयांचा फायदा देण्यास सांगितले आहे.

(२) विकासकाने संबंधित राष्ट्रीय नफाखोरीविरोधी प्राधिकरणाच्या आदेशाविरूद्ध मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका (Writ Petition No. ३३८८७/२०२२) दाखल केली असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

-----------------

## अंबरनाथ येथील नमाऊ केम कंपनीतील औषध निर्मितीच्या कच्च्या मालाचा ड्रग्ज बनविण्याकरीता वापर करण्यात येत असल्याबाबत

**(१९)** * **१८१५९ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये अंबरनाथ व नालासोपारा येथे १४०० कोटी रुपयांचे एमडी हे ड्रग्ज पकडले असून पथकाने अंबरनाथच्या खाजगी नमाऊ केम कंपनीत शोध मोहिम केली असता सदर कंपनी औषध निर्मिती करीता आवश्यक १४ प्रकारचे कच्चामाल तयार करुन आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निर्यात करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या केमिकल कंपनीतून एमडी हे ड्रग्ज बनविण्यासाठी लागणारा साहित्याचा पुरवठा केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, देशातील नामांकित औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना अंबरनाथच्या नमाऊ केम कंपनीतून कच्चामाल मोठ्या प्रमाणात पुरवण्यात येतो, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त दोषी कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मुंबई गु.र.क्र. २५/२०२२ कलम ८ (क) सह २२ (क), २९ एन. डी. पी. एस. ॲक्ट-१९८५ या दाखल गुन्हयात एकूण २४२८ किलो ९५८ ग्रॅम मेफेड्रॉन किंमत अंदाजे रुपये ४८५६ कोटी ४१ लाख ४ हजार रूपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त केला आहे. त्यापैकी नालासोपारा पश्चिम, जिल्हा - पालघर येथून एकूण ७०१ किलो ७४० ग्रॅम वजनाचा 'एम.डी.' (मेफेड्रॉन) किंमत अंदाजे रूपये १४०३ कोटी ४८ लाख किंमतीचा मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

तसेच नमाऊ केम प्रा. लि. या फॅक्टरीमधून अंमली पदार्थ एम.डी. (मेफेड्रॉन) तयार करण्याकरीता विविध स्टेजमधील पारदर्शक प्लॅस्टीक पिशव्यांमध्ये ठेवण्यात आलेले एकूण ०८ नमुने त्याचे एकूण वजन ९७४१ ग्रॅम (ii) अंतिम उत्पादन तयार झाल्यानंतर नमुना म्हणुन पारदर्शक प्लॅस्टीक पिशवीमध्ये ठेवण्यात आलेला अंमली पदार्थ 'एम.डी.' (मेफेड्रॉन) वजन ४५१ ग्रॅम, किंमत रुपये ९०,८०,०००/-)(iii) Bromine २nd Stage- २० Ltr, (iv)Bromine - ४८५ ml, (v) Mono Methylamine - २० Ltr (vi) Recover Choloroform-२० Ltr. हे जप्त करण्यात आले आहे.

नमाऊ केम प्रा. लि. या फॅक्टरी मध्ये एकूण १४ औषध निर्मिती करीता आवश्यक असणारे रासायनिक पदार्थ (इंटरमीडिएट) तयार करण्यात येतात.

नमाऊ केमी प्रा.लि. कंपनीने २०२० पुर्वी कोणतीही निर्यात केली नसून, कोविड दरम्यान ऑक्टोबर, २०२० नंतर फार्मास्युटिकल कंपन्यांना कोविड - १९ औषधाच्या कच्च्या मालाची निर्यात केली आहे.

कंपनीमधे निर्मिती केलेले १४ रासायनिक पदार्थ हे औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना पुरवठा करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(४) अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मुंबई गु.र.क्र. २५/२०२२ कलम ८ (क) सह २२(क), २९ एन. डी. पी. एस. ॲक्ट-१९८५ हा गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयात नमाऊ केम प्रा.लि. चे मालक जिनेंद्र रविचंद्र वोरा व मॅनेजर किरण रामकृष्ण चौधरी यांचासह ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सर्व आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नायलॉन मांजाला बंदी असतानाही त्याची तस्करी करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२०) * १८२८४ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हमरापूर–गालतरे (जि.पालघर) येथे रस्त्यावरून जाणाऱ्या एका वाहनाच्या सनरुफमध्ये उभा असलेल्या ८ वर्षीय चिमुकल्याचा गळा पतंगाच्या नायलॉन मांजाने कापल्यामुळे मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव होवून त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत महिनाभरात पतंगबाजीसाठी नायलॉन मांजाचा वापर केल्यामुळे राज्यभरात सुमारे ३८ जण जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची गंभीर दखल घेवून शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि राज्यात नायलॉन मांजाला बंदी असतानाही त्याची तस्करी करणाऱ्या विक्रेत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाची बातमी दिनांक २६/०१/२०२३ रोजी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, मयत मुलाच्या वडिलांनी कोणाविरुध्द तक्रार केलेली नसून मयत मुलाचे शवविच्छेदन केलेले नसल्याने व त्याच्या मृत्यूबाबत कोठेही नोंद केलेली नसल्याने मुलाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याबाबत निश्चित माहिती प्राप्त होऊ शकली नाही.
(२) जानेवारी, २०२३ मध्ये नायलॉन मांजाचा वापर केल्यामुळे राज्यभरात पाच जण जखमी आणि तीन जणांचा मृत्यू झाल्याची नोंद झालेली आहे.
(३) नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक करणारे आणि नायलॉन मांजाच्या सहाय्याने पतंग उडविणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याच्या सूचना पोलीस महासंचालक कार्यालयाकडून सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक यांना देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने, राज्यात प्रतिबंधीत नायलॉन मांजाची तस्करी, विक्री करणारे दुकानदार, नायलॉन मांजाच्या सहाय्याने पतंग उडविणारे नागरिक यांच्या विरोधात भारतीय दंड संहिता कलम १८८, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, कलम ५, १५ आणि सीआरपीसी कलम १४९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तसेच, नायलॉन मांजाचा बेकायदेशीर वापर

रोखण्यासाठी सोशल मिडीया व प्रसार माध्यमांद्वारे जनतेस नायलॉन मांजा वापराच्या दुष्परिणामाबाबत जनजागृती करण्यात आली असून ऑनलाईन शॉपींग कंपन्या उदा. फ्लिपकार्ट, ॲमॅझॉन इ. यांना ऑनलाईन मांजा विक्री न करण्याबाबत सायबर विभागाकडून ई-मेलद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणातील पश्चिम वाहिनी नद्यांचे अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणेबाबत.

**(२१) * १७१८८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १२५५७ ला दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोदावरी खोऱ्यात पश्चिम वाहिनी नदयांचे अतिरिक्त वाया जाणारे पाणी वळविण्यासंदर्भात सदस्य सचिव तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांनी शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नदी जोड योजनांचे अहवालावरून राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक व महाराष्ट्र जल संपर्क निर्माण करणाची मान्यता पूर्ण करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदरील कामाची प्रशासकीय मान्यता व निधीची तरतूद करण्याबाबत राज्य शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे वा आली आहे,
(४) असल्यास, याबाबत थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक १७/०९/२०१९ अन्वये, पश्चिम वाहिनी नदीखोऱ्यातून (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविणेसाठी दिनांक ३१/१०/२०१९ अन्वये शासनास अहवाल सादर केलेला आहे.
(२) दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत तयार करण्यात येत असून मार्च, २०२३ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

पार-गोदावरी नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे प्रशासकीय मान्यता देण्याच्या दृष्टीने तांत्रिक तपासणीसाठी सादर केला असून त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

उपरोक्त प्रमाणे राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती यांची सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता प्राप्त झाल्यानंतर क्षेत्रिय स्तरावर सदर प्रकल्पास, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम ११ (च) अंतर्गत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे. उपरोक्त मान्यता प्राप्त झाल्यानंतर, राज्याची आर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार नदीजोड प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे शक्य आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अक्कलकुवा (जि.नंदुरबार) तालुक्यातील रामपूर धरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२२) * १७४६१ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा (जि.नंदुरबार) तालुक्यातील अतिदुर्गम भागात असलेल्या ग्रामस्थांना कायम स्वरुपी पाणी उपलब्ध व्हावे याकरीता सन १९९९ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या रामपूर धरणाचे काम आतापर्यंत केवळ ५० टक्केच पूर्ण झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धरणाचे काम करणाऱ्या ठेकेदारास अद्यापही कामाचे देयके अदा करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रामपूर धरणाचे काम करणाऱ्या ठेकेदाराने काम पूर्ण करण्याची तयारी दर्शवूनही उक्त प्रकल्पांची जबाबदारी असलेले मा.जिल्हाधिकारी, नंदुरबार आणि जलसंपदा विभागाचे अधिकारी यांचे त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे तसेच उक्त अधिकारी हे अर्धवट अवस्थेत असलेले काम पूर्ण होण्यास अडथळे निर्माण करत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अक्कलकुवा तालुक्यातील रामपूर धरणाचे काम पूर्णत्वास नेऊन त्याचा लाभ परिसरातील ग्रामस्थांना प्रत्यक्ष मिळण्यासाठी कोणती निर्णयात्मक कार्यवाही वा उपाययोजना केली आहे तसेच धरणाचे काम अपूर्ण अवस्थेत ठेवण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

रामपूर ल.पा. प्रकल्पास मूळ प्र.मा. सन-१९८० मध्ये मिळाली. त्यानंतर बुडीत क्षेत्रातील रामपूर गावातील प्रकल्पग्रस्तांचा तीव्र विरोध व अव्यवहार्य मागण्यांमुळे भूसंपादन होऊ शकले नाही. या प्रकल्पाची मूळ प्र.मा. व्यपगत झाली असल्याने सन-१९९६ मध्ये पुन: प्रशासकीय मान्यता घेण्यात आली.

प्रकल्पाच्या कामास सन-२०१२ मध्ये सुरूवात करण्यात आली, परंतु त्यावेळी रामपूर गावातील प्रकल्पग्रस्तांनी तीव्र विरोध करुन काम बंद पाडले. तदनंतर सन-२०१८ मध्ये पुन्हा प्रकल्पाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आले. सन-२०१८ ते २०२३ पर्यंत प्रकल्पग्रस्तांची समजुत काढुन व महसूल विभागाच्या समन्वयाने आजमितीस मुख्य धरणाचे भौतिक काम ७५ टक्के काम पूर्ण झालेले असून वितरीत व्यवस्थेचे व उर्वरीत काम प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत सदर कामाच्या स्विकृत निविदा किंमत २०८.५० लक्ष पैकी आज पर्यंत रुपये १५९.३५ लक्ष (भाववाढ वगळुन) म्हणजेच ७६.४३ % इतक्या किंमतीचे देयके ठेकेदारास अदा करण्यात आलेली असून कोणतीही देयके प्रलंबित नाहीत.

(३) हे खरे नाही.

रामपूर ल.पा. प्रकल्पाचे काम सध्यःस्थितीत प्रगतीपथावर आहे.

प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत प्रकल्प पूर्ण होणेस्तव बुडीतक्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांना प्रत्यक्ष भेटुन मोबदला स्विकारण्याबाबत मने वळविणे तसेच महसूल विभागाकडे प्रकल्पग्रस्तांना मोबदला तात्काळ वाटप व्हावा म्हणून बैठका तथा पाठपुरावा इ. कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रकल्पाच्या बुडीतक्षेत्रातील काही प्रकल्पग्रस्तांचा जमीनीच्या बदल्यात जमीन व इतर अवाजवी मागण्यांमुळे भुसंपादन मोबदला स्विकारण्यास विरोध होत असल्याने व मोबदला स्विकारण्यास तयार असलेले प्रकल्पग्रस्त मोबदला मिळणेस आवश्यक कागदपत्र वारसहक्क दाखला, मृत्यूदाखला, वंशावळ इ. दस्ताऐवज अर्जासोबत सादर न करु शकल्याने महसूल विभागामार्फत मोबदला वाटपास विलंब होत आहे. त्यामुळे, सर्व भुधारकांनी मोबदला स्विकारल्यास प्रकल्पाची घळभरणी करणे शक्य होणार आहे.

प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातुन जाणाऱ्या मोरंबा-शेंदवाण रस्त्यास कायमस्वरुपीचा पर्यायी वळण रस्ता करणेस्तव जलसंपदा विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागास रुपये २.१८ कोटी निधी वर्ग करण्यात आला असून उर्वरीत निधी रुपये ३.०६ कोटी लवकरच वर्ग करणेत येत आहे. सा.बां. विभागाकडुन सदर कायमस्वरुपीचा पर्यायी वळण रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाल्यास प्रकल्पाची घळभरणी करणे शक्य होणार आहे.

-----------------

## पैठण (जि.औरंगाबाद) येथील जायकवाडी धरणापासून परभणीपर्यंतच्या डावा कालवा, शाखा कालवे, वितरिका व लघुवितरकांची दुरुस्ती करण्याबाबत

**(२३) * १८१२५ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) येथील जायकवाडी धरणापासून परभणीपर्यंत असलेल्या २०८ किलोमीटर लांबीच्या डाव्या कालव्यास शाखा कालवे वितरिका आणि उपवितरिकांवर मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे उगवल्याने पाण्याची मोठ्या प्रमाणात गळती होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे कालव्याची वाहन क्षमता ६० टक्के पर्यंत कमी झाल्याने शेतकऱ्यांना पुरेशे आणि वेळेत जल आवर्तने मिळत नाहीत हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, डाव्या कालव्यासह पाच शाखा कालवे आणि वितरिका, लघुवितरकांची दुरुस्ती तातडीने करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

जायकवाडी प्रकल्पांतर्गतच्या पैठण डावा मुख्य कालवा, शाखा कालवे, वितरीका आणि उपवितरिकांवर मोठ्या प्रमाणात झाडे-झुडपे तयार होतात. सदर झाडेझुडपे दरवर्षी पाखरण कार्यक्रमांतर्गत विभागांतर्गत यांत्रिकी संघटनेकडून काढली जातात.

सद्य:स्थितीत कालव्यावरील विविध बांधकामांतून काही प्रमाणात गळती होत आहे. तथापि, कालव्यास मोठ्या प्रमाणात कुठेही गळती नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

पैठण डावा मुख्य कालव्यासह संपूर्ण वितरणप्रणालीची संकल्पित वहनक्षमता ६०% पर्यंत कमी झाली आहे. तथापि, शेतकऱ्यांना पुरेसे व वेळेत जल आवर्तने देण्यात येत आहेत.

(३) पैठण डाव्या कालव्यासह संपूर्ण वितरणप्रणालीच्या दुरुस्तीच्या अनुषंगाने सविस्तर सर्वेक्षण करुन अंदाजपत्रकासह सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्याच्या विविध विभागांतील सांख्यिकी अधिकारी संवर्गातील पदे रद्द करण्यात येत असल्याबाबत

**(२४) * १७३७२ श्री.प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या नियोजनबध्द विकासासाठी सामाजिक, आर्थिक तसेच मूलभूत व पायाभूत क्षेत्रातील सांख्यिकी माहिती उपलब्ध करून देणारा तसेच दरवर्षी आर्थिक पाहणी अहवाल सादर करून राज्याच्या सद्य:स्थितीचा लेखाजोखा मांडणारा अर्थ व सांख्यिकी विभाग दुर्लक्षित असून विविध विभागातील सांख्यिकी अधिकाऱ्यांची पदे रद्द केली जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधारित आकृतिबंध तयार करण्याच्या नावाखाली विविध विभागातील सांख्यिकी अधिकाऱ्यांची पदे वगळली जात असून अर्थ व सांख्यिकी संचालनालयाशी संबंधित जवळपास १५० अधिकाऱ्यांची पदे रद्द करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियोजन विभागाच्या अखत्यारितील अर्थ व सांख्यिकी संचालनालयाला राज्य शासनाच्या सांख्यिकी बाबीसाठी नोडल यंत्रणा घोषित केलेली असून लोकप्रतिनिधी, स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक आदींना उपयुक्त ठरणारा महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल या विभागामार्फत प्रकाशित केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १९९५-१९९९ या काळात शासनाने अर्थ व सांख्यिकी संचालनालयाची पुर्नरचना करण्यासाठी नेमलेल्या समितीने आपला अहवालही शासनाला सादर केला असून त्या अहवालात “मंत्रालयात स्वतंत्र व स्वतंत्र सांख्यिकी विभाग तयार करण्यात यावा तसेच शासनाच्या विविध विभागाला अधिकारी व कर्मचाऱ्याच्या नियुक्तीसाठी महाराष्ट्र अर्थ व सांख्यिकी सेवा निर्माण करण्यात यावी, अशी शिफारस केलेली असतानाही त्यावर आजमितीस शासनाकडून कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्याची सामाजिक व आर्थिक विकासाची धोरणे ठरवण्यासाठी विविध क्षेत्रातील सांख्यिकी माहिती आधारभूत व उपयुक्त असल्यामुळे अशा दुर्लक्षित विभागाच्या सांख्यिकी अधिकाऱ्यांची पदे कायम ठेवण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नाही, हे खरे नाही

(५) होय. कार्यवाही करण्यात आली आहे.

-----------------

## भोगलवाडी (ता.धारूर, जि.बीड) येथील विजेचा शॉक लागून मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळणेबाबत.

**(२५)** * **१७००५ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोगलवाडी (ता.धारूर, जि.बीड) येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील टिक टॉक वरून प्रसिद्धीस आलेला संतोष मुंडे व त्याच्या सोबत असलेल्या एका तरुणाचा महावितरणच्या विज रोहीत्राचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरीब शेतकरी कुटुंबातील संतोषने ग्रामीण भाषा, सहज विनोद व देहबोलीचा कलात्मक वापर करून चांगली प्रसिद्धी मिळवली होती, ग्रामीण भागातील विजेच्या अपुऱ्या सुविधेमुळे शेतकऱ्यांच्या मुलांना बरीच कामे आपला जीव धोक्यात घालून स्वतः करावी लागतात, या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला असून या दुर्दैवी अपघाताची जबाबदारी महावितरणने घ्यावी तसेच संतोष व अपघाती मृत्यू झालेल्या अन्य तरुणाच्या कुटुंबास शासनाने तात्काळ आर्थिक मदत द्यावी अशी मागणी हिवाळी अधिवेशन २०२२ मध्ये लोकप्रतिनिधी यांनी विशेष उल्लेखाद्वारे शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन संतोष व अपघाती मृत्यू झालेल्या अन्य तरुणाच्या कुटुंबास तात्काळ आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

मौजे भोगलवाडी येथे आई मंदीर रस्त्यालगत सिंगल फेज रोहित्र (२५*३ KVA) आहे. दिनांक १३/१२/२०२२ रोजी संध्याकाळी ०६.३० च्या सुमारास मयत कृष्णा बाळासाहेब मुंडे, रा. भोगलवाडी ता.धारुर, जि.बीड हे जनावरे हाकलत असताना एक गाय ही रस्त्याजवळील आई मंदीर रोहित्राकडे गेली होती. सदरील गाईला हाकलत असताना मयत कृष्णा बाळासाहेब मुंडे हे अनावधानाने वीज वितरण पेटीच्या विद्युत पुरवठ्याच्या संपर्कात आल्यामुळे त्यांना विजेचा धक्का लागला. त्यानंतर मयत संतोष अप्पाराव मुंडे हे कृष्णा बाळासाहेब मुंडे यांना वाचवायला गेले असता त्यांना सुध्दा विजेचा धक्का लागला त्यामुळे दोन्ही व्यक्तींना विजेचा धक्का लागून प्राणांतिक अपघात झालेला आहे.

(२) लोकप्रतिनिधींकडून विशेष उल्लेखाव्दारे मागणी प्राप्त झाली आहे.

(३) सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक कार्यालय, बीड यांचे मार्फत करण्यात आली आहे. त्यांच्या चौकशी अहवालात सदर अपघातास महावितरण जबाबदार असल्याचे नमूद केले आहे. सदरील दुर्घटनामधील मृतांच्या नातेवाईक श्रीमती सुनिता संतोष मुंडे (संतोष आप्पाराव मुंडे यांच्या पत्नी) व श्रीमती उषा कृष्णा मुंडे (कृष्णा बाळासाहेब मुंडे यांच्या पत्नी) यांना तातडीची मदत म्हणून प्रत्येकी रुपये २०,०००/- दिनांक १४/१२/२०२२ रोजी देण्यात आलेले आहेत. तसेच उर्वरित नुकसान भरपाई रक्कम रुपये ३,८०,०००/- च्या प्रस्तावास अधीक्षक अभियंता, बीड यांनी दिनांक १६/०२/२०२३ च्या पत्रानुसार मंजुरी दिली आहे. वारसाहक्क प्रमाणपत्र प्राप्त होताच सदर रक्कम मयतांच्या नातेवाईकास अदा करण्यात येईल. तसेच सदर अपघातासंदर्भात उपविभागीय अधिकारी धारुर व शाखा अधिकारी, चिंचवन यांना कारणे दाखवा नोटीस अधीक्षक अभियंता, बीड यांनी दिली आहे. सदर प्रकरणाची पूर्ण चौकशी करुन नियमानुसार दोषी कर्मचाऱ्यांवर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालाड येथे साखळी बॉम्बस्फोट घडवून आणण्याची धमकी देणाऱ्या गुन्हेगारावर कारवाई करण्याबाबत

**(२६)** * **१७५९६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालाड येथून १९९३ प्रमाणे साखळी बॉम्बस्फोट घडवून आणण्याची धमकी देणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला दहशतवादी विरोधी पथकाने दिनांक ७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास अटक केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई पोलिसांना या संदर्भातील तपासात काय आढळून आले,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दहशतवादी विरोधी पथकाकडून गुन्हेगारावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे असून आरोपीस दिनांक ०८/०१/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.
(२) व (३) मुंबईमध्ये १९९३ मध्ये बॉम्बस्फोट झाले त्याप्रमाणे दोन महिन्यामध्ये बॉम्बस्फोट होणार असल्याचा खोटा कॉल मुख्य नियंत्रण कक्षास करुन जनमानसात भिती पसरविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपीविरुध्द दिनांक ०८/०१/२०२३ रोजी भारतीय दंड संहिता कलम ५०५ (१), ५०६ (२), १८२ अन्वये आझाद मैदान पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ६/२०२३ दाखल करण्यात आला आहे. दहशतवाद विरोधी पथक, जुहू युनिट यांनी आरोपीस अटक करुन तपासकामी आझाद मैदान पोलीस स्टेशन, मुंबई यांच्या ताब्यात दिले असून आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. नमूद गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी जिल्ह्यातील नागरिकांचे रोजगारासाठी होणारे स्थलांतरण रोखण्यासाठी मंजूर केलेल्या योजनेबाबत

**(२७) * १७६६० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी जिल्ह्यातील नागरिकांचे रोजगारांसाठी होणारे स्थलांतर रोखण्यासाठी शासनाने संसदीय संकुल उपक्रम योजनेस मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात आदिवासी वस्ती असलेल्या सर्व गावांमध्ये संसदीय संकुल उपक्रम योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास सदर योजनेचे स्वरूप व निकष काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

अशा योजनेला राज्य शासनाकडून मंजूरी देण्यात आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सहा मध्यम सिंचन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(२८) * १७०४२ श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ८५ कोटी रकमेचे सहा मध्यम सिंचन प्रकल्प २५ वर्षानंतरही अपूर्ण अवस्थेत असून सदर प्रकल्पाची किंमत आता ६०० कोटी रूपये इतकी झाली असून जलसंपदा विभागाअंतर्गत सिंचन प्रकल्पाच्या नियोजनातील अकार्यक्षमतेमुळे खर्चात वाढ होवून ते प्रलंबित असल्याची बाब दिनांक ३० डिसेंबर, २०२३ रोजी ‘कॅग’ ने जाहीर केलेल्या अहवालातून समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात प्रामुख्याने आंधळी (सातारा), पिंपळगांव (सोलापूर), पूर्णा (अमरावती), हरणघाट (चंद्रपूर), सोंड्याटोला (भंडारा) आणि वाघोलीबुटी (चंद्रपूर) हे मध्यम सिंचन प्रकल्प प्रदिर्घ काळापासून रखडले असल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या सिंचन क्षेत्रात वाढ झालेली दिसुन येत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या निर्मितीपासून ६२ वर्षात उभारण्यात आलेल्या मोठे मध्यम आणि लघु अशा ३ हजार ८७७ पाटबंधारे प्रकल्पांमुळे सिंचना खालील क्षेत्रात ३.८६ लाख हेक्टर वरून जून, २०२० अखेर ५४.१५ लाख हेक्टर पर्यंत वाढ झाली आहे,हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित असलेल्या सिंचन प्रकल्पांना तातडीने आवश्यक निधी उपलब्ध करून ते पूर्ण करणेबाबत तसेच राज्यातील अवर्षण प्रवण भाग पाण्यापासून वंचित राहू नये यासाठी उपसा सिंचन योजनांचे योग्य नियमन आणि पाण्याची योग्य वितरण होण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापनात सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे,

भारताचे नियंत्रक व लेखापरिक्षक यांचा भुपृष्ठ सिंचनातील परिणामावर निष्पादन लेखा परिक्षण अहवाल दिनांक ३० डिसेबर, २०२२ रोजी विधानमंडळात सादर करण्यात आला होता.सदर अहवालात पुढीलप्रमाणे नमूद आहे :-

| | |
|---|---|
| ११ ते २५ वर्षाच्या विलंबाने पूर्ण झालेले प्रकल्प | ०४ आंधळी (सातारा), हरणघाट (चंद्रपूर), सोंड्याटोला (भंडारा) आणि वाघोलीबुटी (चंद्रपूर) |
| २० वर्षापेक्षा अधिक काळ लोटून पूर्ण न झालेले प्रकल्प | ०२ (पिंपळगांव (सोलापूर), पूर्णा (अमरावती), |

(२) हे अंशत: खरे आहे.

नमूद ६ प्रकल्पामुळे एकूण ३८,८२६ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मितीचे लक्ष होते. तथापि, सद्य:स्थितीमध्ये एकूण ३१,५१० सिंचन क्षेत्र निर्मीत झाले आहे.

(३) होय.

(४) बांधकामाधीन सिंचन प्रकल्प लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रकल्प नियोजन, निधी उपलब्धता व बांधकाम व्यवस्थापनाबाबतचे धोरण दिनांक ०८ संप्टेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहे व त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. राज्यामध्ये उपसा सिंचन योजना हाती घेण्याबाबत दिनांक २३/११/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. उपसा सिंचन योजना व प्रकल्पाच्या पाण्याचे योग्य वितरण होण्याच्या अनुषंगाने सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन आणि इतर बाबींसाठी महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १९ मे, २००५ च्या अधिसूचनेद्वारे निर्देश देण्यात आलेले आहेत. दिनांक ४ मे, २००५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे नियमन व व्यवस्थापन करण्याकरीता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जेएनपीटी बंदरामधून स्लज ऑईलची तस्करी होत असल्याबाबत

**(२९) * १७६३५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील जेएनपीटी बंदरावर जगभरातून येणाऱ्या शेकडो मालवाहतूक जहाजातून सुमारे १ लाख मेट्रीक टन स्लज ऑइल उतरविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे स्लज ऑईल उतरविण्यासाठी जेएनपीटी बंदर व्यवस्थापनाने विशेष व्यवस्था करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मोफत मिळणाऱ्या स्लज ऑईलच्या कामात कोटयवधीची कमाई होत असून स्लज ऑईलच्या नावाखाली जहाजातून डिझेल, शुध्द ऑईल चोरटया मार्गाने काढण्यात येवून त्याची मोठ्या प्रमाणात तस्करी होत असल्याचे निदर्शनास येवूनही याबाबत स्थानिक पोलीस प्रशासनाने अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जेएनपीटीचे संबंधित अधिकारी, बंदरातील सुरक्षा यंत्रणा, पोलीस, कस्टम विभागाच्या काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने होत असलेल्या या तस्करीमुळे बंदरासह देशाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने बंदराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) जवाहरलाल नेहरू पोर्ट ॲथोरिटी मार्फत १० जुलै, २०२५ पर्यंत एकूण १२ कंपन्याना स्लज ऑईल काढण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिले असून सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात ४४९८ मेट्रीक टन स्लज ऑईल उतरविण्यात आले आहे.
(३) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडील न्हावाशेवा पोलीस ठाणेचे हद्दीत स्लज ऑईलच्या नावाखाली जहाजातून डिझेल, शुध्द ऑईल चोरटया मार्गाने काढणे किंवा त्याची मोठ्या प्रमाणात तस्करी होत असल्याचे निदर्शनास आले नसल्याने कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) जवाहरलाल नेहरू पोर्ट ॲथोरिटी मार्फत स्लज ऑईल काढण्याच्या परवानग्या विहीत अटी व शर्तीनुसार दिल्या जातात व याकरीता प्रती मेट्रीक टन रक्कम रुपये १५००/- त्यावर जीएसटी व पोर्ट चार्जेस लावले जातात.

अशा परवानगी दिलेल्या कंपनीशिवाय इतर कंपनी असे ऑईल काढत नाही. स्लज ऑईल काढण्यासाठी मानक कार्यपध्दतीनुसार कारवाई केली जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील चिल्हेवाडी धरण पाणीपुरवठा योजनेचे काम बंद असल्याबाबत

**(३०) * १७८७३ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्याच्या पूर्व पटटयासाठी चिल्हेवाडी धरण पाणीपुरवठा योजनेचे काम अनेक वर्षापासून बंद असल्याचे नुकतेच माहे जाने, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू काम बंद असल्याने सदर योजनेकरीता आणलेले पाईप निकामी पडून आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजना डुबरवाडी, खामुंडी, गायमुखवाडी, पिंपरी पेंढार, नवलेवाडी, पदिरवाडी वडगाव, आनंद संतवाडी, कोळवाडी, उंचखडक आदि परिसरतील सिंचन योजनेचे काम बंद असल्याने या परिसरातील शेतकरी पाण्यापासून वंचित आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोट्यवधी रुपयांची योजना निकामी पडून असण्यामागची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितावर कारवाई करण्याबाबत तसेच उक्त योजना सुरू करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत : खरे आहे, चिल्हेवाडी धरण बंदिस्त नलीका वितरण प्रणालीचे काम सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी मार्च-२०१९ पासून बंद ठेवण्यात आले होते.
(२) हे खरे नाही, सदर प्रकल्पावर आज अखेर १८.२५ कि.मी. लांबीचे पाईपलाईनचे काम पूर्ण झाले आहे. सुप्रमाअभावी सदर योजनेचे काम बंद झाले त्यावेळेस कंत्राटदाराने २१०० मी. लांबीचे पाईप क्षेत्रियस्थळी आणून ठेवले होते. तथापि, सुप्रमा नसल्याने त्याचा वापर करता आला नव्हता.तथापि, या प्रकल्पास दिनांक १४/०२/२०२३ रोजी सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून पाईप उभारणीचे पुढील कामाची सुरुवात करण्यात आली आहे.
(३) अंशत: खरे आहे, प्रकल्पास सुप्रमा प्राप्त झाल्याने आता कामास पुन्हा सुरुवात करण्यात आली आहे.
(४) सदर योजनेस द्वितीय सुप्रमा मंजुरी प्राप्त झाल्याने कामास सुरुवात करण्यात आली आहे.
(५) चिल्हेवाडी मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचा खर्च मंजूर सुप्रमापेक्षा जास्त होत असल्याने द्वितीय सुप्रमा मंजूरी मिळेपर्यंत कामे थांबवावी लागली होती. सदर योजनेच्या द्वितीय सुप्रमा प्रस्तावास शासन निर्णय, जलसंपदा विभाग, दिनांक १४/०२/२०२३ अन्वये रुपये ३१३.४८ कोटी इतक्या रक्कमेस मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार आता सदर योजनेचे उर्वरित काम सुरु करण्यात आले आहे.

-----------------

## मुंबईतील सेक्सटॉर्शन, अश्लील मेल/ एसएमएस यांसारख्या गुन्ह्यांचा तपास जलदगतीने होणेबाबत

**(३१) * १८२८६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत सेक्सटॉर्शन प्रकरणी जानेवारी ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत ७७ गुन्ह्यांची नोंद पोलीस दफ्तरी झाली असून त्यापैकी अवघ्या २४ गुन्ह्यांचा तपास करण्यात पोलिसांना यश आले असल्याची माहिती दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अश्लील मेल/एसएमएस प्रकरणी ४०० गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यापैकी अवघ्या ८७ गुन्ह्यांचा तपास पोलिसांनी लावला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील सेक्सटॉर्शन, अश्लील मेल/एसएमएस यांसारख्या गुन्हांचा तपास जलदगतीने लागण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) आणि (२) मुंबईत सेक्सटॉर्शन प्रकरणी सन २०२२ मधे ७७ गुन्हे नोंद झाले असून त्यापैकी २९ गुन्हे उघड झाले आहेत. तसेच अश्लिल मेल / एसएमएस प्रकरणी ४०० गुन्हे दाखल असून त्यापैकी ९४ गुन्हे उघड झाले आहेत.
(३) विषयांकित प्रकरणी खालील उपाययोजना शासनामार्फत करण्यात येत आहे:-

अ) मुंबई पोलीस आयुक्तालयात प्रादेशिक स्तरावर ५ सायबर पोलीस ठाणी उभारण्यात आली आहेत.

ब) मुंबई पोलीस दलामध्ये महत्वाच्या तसेच संवेदनशील गुन्हयांचा तपास खाजगी सायबर तज्ञांच्या मदतीने केला जातो.

क) सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या अधिकारी व अंमलदार यांना सायबर गुन्हयाचा तपास करण्याबाबतचे प्रशिक्षण देऊन अपडेट व अपग्रेट केले जाते तसेच त्यांना सायबर फॉरेन्सिक टूल्स हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जाते.

ड) संभाव्य सायबर गुन्हे टाळण्यासाठी सोशल मिडियाद्वारे देखील सर्वसामान्य नागरिकांना सायबर गुन्ह्याच्या अनुषंगाने सावध राहण्याचे आवाहन केले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाने प्रकल्पाच्या मुदतवाढीसाठी खरेदीदारांच्या ५१ टक्के मंजूरीची घातलेली अट शिथिल करण्याचा घेतलेला निर्णय रद्द करण्याबाबत

**(३२) * १८०९० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रखडलेले बांधकाम प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावेत यासाठी व प्रकल्प पूर्ण करण्याची इच्छा असलेल्या विकासकांसाठी महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाने (महारेरा) प्रकल्पाच्या मुदतवाढीसाठी खरेदीदारांच्या ५१ टक्के मंजूरीची घातलेली अट शिथिल करण्याचा निर्णय प्राधिकरणाने माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे विकासकांचा मनमानी कारभार सुरु होवून ग्राहकांची फसवणूक होण्यास मदत होणार असल्याने प्राधिकरणाने सदरहू निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाने घेतलेला निर्णय रद्द करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील कलम ६ नुसार प्रलंबित प्रकल्पांना महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणामार्फत १ वर्षाची मुदतवाढ देण्यात येते. प्रकल्प पूर्ण होण्यास यापेक्षा जास्त कालावधी लागत असल्याने विकासकास मुदतवाढ हवी असल्यास, ५१% पेक्षा जास्त खरेदीदारांची सहमती असणे आवश्यक आहे. तथापि, काही प्रकल्पांमध्ये खरेदीदार सहमती देत नाहीत, अशा वेळी सदनिकाधारकांच्या हितास बाधा न येता, प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टिकोणातून विकासक महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे मुदतवाढीसाठी अर्ज करू शकतात. सदर अर्जाची छाननी प्राधिकरणामार्फत करून अर्जावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे आदेश महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने दिनांक २७/१२/२०२२ रोजी निर्गमित केलेले आहेत. सदर प्रकरणी प्राधिकरणाकडून सविस्तर माहिती मागविण्यात आलेली आहे. सदर माहिती प्राप्त झालेनंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा नियोजन समितीचा जिल्हा विकास निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(३३) * १८२४२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२२ -२३ या आर्थिक वर्षात राज्यातील जिल्ह्यांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण मानला जाणारा जिल्हा नियोजन समितीचा जिल्हा विकास निधी केवळ १४.४७ टक्के एवढाच खर्च झाला असून तब्बल ८५.५३ टक्के निधी शिल्लक असल्याची बाब दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,विद्यमान शासनाने जिल्हा नियोजनातील कामांना दिलेल्या स्थगितीमुळे सदरहू निधी खर्च होवू शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार राज्यातील जिल्हा नियोजन समितीचा सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील जिल्हा विकास निधीचा पूर्ण विनियोग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

नियोजन विभागाच्या दिनांक ०४/०७/२०२२ च्या परिपत्रकान्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२२-२३ अंतर्गत दिनांक ०१/०४/२०२२ पासून विविध योजनांतर्गत कामांना देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतांना स्थगिती देण्यात आली होती. त्यानंतर सर्व जिल्ह्यांसाठी पालकमंत्री महोदयांच्या नियुक्त्या केल्यानंतर, उपरोक्त परिपत्रकान्वये देण्यात आलेली स्थगिती दिनांक २७/०९/२०२२ च्या पत्रान्वये उठविण्यात आली आहे. तसेच, मार्च, २०२३ अखेरपर्यंत सर्व निधी खर्च करण्याबाबत नियोजन करण्याचे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक ०७/०२/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले असून, जिल्हाधिकारी स्तरावर त्याप्रमाणे नियोजन करण्यात येत आहे.

-----------------

## केदारगुडा (ता.हदगांव, जि.नांदेड) येथील शासकीय निवासी आश्रम शाळेतील मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याबाबत

**(३४) * १७४३९ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केदारगुडा (ता.हदगांव,जि.नांदेड) येथील शासकीय निवासी आदिवासी आश्रम शाळेतील चौथीत शिकणाऱ्या मुलीने दिनांक १२ डिसेंबर, २०२२ रोजी शाळेतच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खोलीच्या दरवाज्याची उंची ६ फुटापेक्षा जास्त असल्यामुळे मुलीच्या हाताला कडी येत नसतानाही खोलीची कडी लावण्यात येणे तसेच पलंगाला लटकुन गळफास घेण्यात आल्याचे तिच्या पालकांना सांगण्यात आल्यामुळे सदर मुलीचे पालक व नातेवाइकांनी मृत्यू संशयास्पद असल्याचा आरोप केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एका वर्षापूर्वी याच निवासी आश्रमशाळेतील सहावीत शिकत असलेल्या एका मुलीने विष प्राशन करुन आत्महत्या केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त आश्रमशाळेतील महिला अधीक्षक पद गेल्या दोन वर्षापासून रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच आश्रमशाळेतील महिला अधीक्षकाचे रिक्त पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय.
(२) होय.

श्री.के.जे. फुलवळकर माध्यमिक मुख्याध्यापक शासकीय आश्रमशाळा, केदारगुडा ता.हदगाव व कंत्राटी स्त्री अधिक्षिका श्रीमती छाया खंदारे यांच्याविरुध्द सदर विद्यार्थीनीचे पालक श्री बाळु देशमुखे यांनी दिनांक १४/१२/२०२२ रोजी पोलीस स्टेशन मनाठा ता.हदगाव जि.नांदेड येथे तक्रार नोंदविली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने श्री के.जे. फुलवळकर व श्रीमती छाया खंदारे यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन मनाठा ता.हदगाव जि.नांदेड येथे भारतीय दंडसहिता १८६० नुसार कलम ३०६, ३२३ व ३४ या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील चौकशी पोलीस विभागामार्फत सुरु आहे.
(३) हे खरे नाही.

मात्र या आश्रमशाळेतील कु. अर्चना धनाजी डाखोरे इयत्ता ७ वी तील विद्यार्थीनीने स्वगावी विष प्राशन केले होते. वैद्यकीय उपचारानंतर तिची प्रकृती ठिक असून ती सध्या या आश्रमशाळेत प्रवेशित आहे.
(४) होय.

सदर शाळेतील स्त्री अधिक्षिका पद रिक्त असल्यामुळे शाळा स्तरावर कंत्राटी तत्वावर स्त्री अधिक्षिकेची नियुक्ती करण्यात आली होती.
(५) दिनांक १२/१२/२०२२ रोजीच्या घटनेच्या अनुषंगाने आपतकालीन आढावा गटामार्फत प्राथमिक चौकशी केली. प्रकल्प अधिकारी, किनवट यांच्या दिनांक १२/१२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये सबंधित शिक्षक कर्मचारी यांच्या पुढील दोन वार्षिक वेतनवाढी कायमस्वरुपी रोखण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यासाठी किनवट प्रकल्प अधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांची समिती गठीत करुन चौकशी करण्यात आली. सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने अपर आयुक्त, अमरावती कार्यालयाने दिनांक २२/१२/२०२२ अन्वये श्री.के.जे.फुलवळकर माध्यमिक मुख्याध्यापक शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, केदारगुडा, ता.हदगाव जि.नांदेड यांना निलंबित केलेले आहे.

सदर आश्रमशाळेत अधिक्षिकेचे पद रिक्त असल्याने प्रकल्प अधिकारी किनवट कार्यालयाच्या स्तरावर शासकीय आश्रमशाळा, जावरला येथील अधिक्षिका यांना शासकीय आश्रमशाळा केदारगुडा येथे स्त्री अधिक्षीका रिक्त पदी प्रतिनियुक्ती देण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील वीज देयक थकबाकीदारांना विलासराव देशमुख अभय योजनेचा लाभ देण्याबाबत

**(३५) * १८२९६ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार तालुक्यातील (जि.पालघर) विज बिल थकबाकी असणाऱ्या ग्राहकांकरीता महावितरणची विलासराव देशमुख अभय योजना दिनांक ३१ डिसेंबर,२०२२ पर्यंत कार्यरत होती या योजनेकरीता तालुक्यातील ४०००८२ लाभार्थी पात्र होते, त्यापैकी केवळ ३९७ ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला असून तालुक्यात ही योजना अपयशी ठरली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात व त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड काळात अनेक ग्राहकांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडीत करण्यात आला असून तत्कालीन शासनाने विलासराव देशमुख अभय योजना ही दिनांक १ मार्च, २०२२ पासून राज्यात अंमलात आणली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेमध्ये ज्या ग्राहकांची ३१ डिसेंबर, २०२१ पूर्वी कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित करण्यात आला होता, अशा ग्राहकांना वीज पुरवठा पुनर्जीवीत करण्याची संधी महावितरणने दिली असून ग्राहकांनी महावितरणकडे अर्ज करूनही महावितरणने त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याची सर्वसाधारण कारणे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जव्हार तालुक्यातील विज बिल थकबाकीदाराला विलासराव देशमुख अभय योजनेचा लाभ देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

जव्हार तालुक्यात ४०८२ कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत केलेले ग्राहक महावितरणव्दारा राबविण्यात आलेल्या विलासराव देशमुख अभय योजनेचा लाभ घेण्यास पात्र होते. परंतु त्यापैकी ४२१ ग्राहकांनी योजनेत भाग घेण्याकरीता अर्ज केला व त्यापैकी योजनेच्या निकषाप्रमाणे पात्र ४११ ग्राहकांना योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

योजनेच्या निकषाप्रमाणे पात्र असणाऱ्या ज्या ग्राहकांनी अर्ज केला अशा सर्व ग्राहकांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

(४) सदर योजना ही कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत असलेल्या ग्राहकांसाठी माहे ऑगस्ट, २०२२ पर्यंत लागू होती. तरी सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त ग्राहकांना देण्यासाठी सदर योजनेचा कालावधी महावितरणच्या दिनांक ०४/१०/२०२२ च्या परिपत्रकाव्दारे कोविड कालावधीनंतरही माहे ऑगस्ट, २०२२ पासून माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत वाढविण्यात आला होता.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळेगाव दाभाडे (जि.पुणे) येथील डी.एस.के.सदाफुले गृहनिर्माण प्रकल्प अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(३६) * १८२६९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगाव दाभाडे (जि.पुणे) येथील डी.एस.के.सदाफुले गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत १६१ कुटुंबियांना सन २०१३ मध्ये घरे खरेदी करुनही प्रकल्प अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे घरांचा ताबा मिळाला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा गृहनिर्माण प्रकल्प सन २०१३ पासून अपूर्ण अवस्थेत राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील प्रकल्प पूर्ण करुन १६१ घरे खरेदीदारांना देण्याच्यादृष्टीने कार्यवाही करून प्रकल्प अपूर्ण अवस्थेत ठेवणाऱ्या विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकल्पाचे काम सन २०१३ मध्ये सुरू करण्यात आले होते. तथापि, सदर प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण होऊ शकलेला नाही. यानंतर जुलै, २०१७ मध्ये या प्रकल्पाची नोंदणी "महारेरा" कडे करण्यात आली. यावेळी प्रकल्प पूर्ण करण्याची मुदत मार्च, २०१८ पर्यंत होती. तथापि, या प्रकाल्पाचे विकासक श्री.डी.एस. कुलकर्णी हे विविध कलमांतर्गत तुरुंगात असल्याने प्रकल्प पूर्ण होऊ शकलेला नाही. घर खरेदीदारांनी जुलै, २०१९ मध्ये महारेराकडे तक्रार केल्यानंतर स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील कलम ७ नुसार सदर प्रकल्पाची नोंदणी रद्द करण्यात आली असून घर खरेदीदारांच्या असोशिएशनतर्फे विकासक नियुक्त करून प्रकल्पाचे काम सुरू केले आहे. सदर प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील वेगवेगळया भागातून गरीब मुलींचा राजस्थान, अहमदाबादमधील गावांमध्ये लग्नासाठी सौदा होत असल्याबाबत

**(३७) * १७८७७ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील वेगवेगळया भागातून गरीब मुलींचा राजस्थान, अहमदाबादमधील काही गावांमध्ये लग्नासाठी एक ते दोन लाख रुपयांत सौदा होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एनसीआरबीच्या अहवालानुसार २०२१ मध्ये ३६३ अल्पवयीन मुलींसह एकूण ४१८ जणींचे लग्नासाठी अपहरण करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने लग्नासाठी मुलींचे अपहरण करण्यात येत असलेल्या गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) एनसीआरबीच्या “क्राईम इन इंडिया-२०२१” या प्रकाशित अहवालामध्ये सन २०२१ मध्ये एकूण ४०५ गुन्हयांमध्ये ४१८ महिलांचे अपहरण करण्यात आले असून त्यामध्ये ३६३ अल्पवयीन मुलींचा समावेश आहे.
(३) राज्यात माहे जानेवारी, २०२३ मध्ये भादंवि कलम ३६६ अन्वये लग्नासाठी महिलांचे अपहरण केल्याचे एकूण २४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. राज्यात भादंवि कलम ३६६ अन्वये लग्नासाठी महिलांचे अपहरण अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये सन २०२१ या वर्षामध्ये एकूण ४४८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. महिला व अल्पवयीन मुलींचे लग्नासाठी अपहरण करणे अशा प्रकारच्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ तसेच भारतीय दंड विधान संहिता नुसार गुन्हे दाखल करून आरोपींविरुध्द कडक कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतून बेपत्ता झालेल्या मुलींच्या तपासाबाबत

**(३८) * १८२४६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १५८४२ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलिसांनी जारी केलेल्या आकडेवारीनुसार गत वर्षभरात मुंबईत महिला अत्याचाराचे ६ हजार १३३ गुन्हे नोंदविण्यात आले असून ६१४ अल्पवयीन मुलींसह ९८४ महिला विकृत वासनेच्या शिकार ठरल्याची बाब दिनांक २१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत १ हजार १५५ अल्पवयीन मुलीसह एकूण १ हजार १६४ मुली बेपत्ता झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतून बेपत्ता झालेल्या मुलींपैकी किती मुलींचा शोध अद्यापपर्यंत लागला आहे,
(४) असल्यास, मुंबईतून बेपत्ता झालेल्या मुलींच्या तपासासाठी शासनाने कोणती ठोस मोहीम हाती घेतली वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०२२ मध्ये बलात्कार शिर्षकाखाली दाखल गुन्हे -

| | | |
|---|---|---|
| १ | १८ वर्षाखालील | ६१४ |
| २ | १८ वर्षावरील | ३७० |
| | एकूण दाखल गुन्हे | ९८४ |

सन २०२२ मध्ये महिला अत्याचाराचे एकूण ६१३३ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(२) मुंबईत दिनांक ०१/०१/२०२२ ते ३१/१२/२०२२ पर्यंत एकूण १३३० अल्पवयीन मुली बेपत्ता असल्यामुळे त्याबाबत अपहरणाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. १८ वर्षावरील एकूण ४४३७ महिला हरवल्याची नोंद आहे.

(३) दिनांक ०१/०१/२०२२ ते दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत मुंबईतील बेपत्ता झालेल्या १३३० मुलींपैकी १०९७ मुली मिळून आल्या आहेत. तसेच १८ वर्षावरील ४४३७ महिलांपैकी एकूण ३०३९ महिला मिळून आल्या आहेत.

(४) • बृहन्मुंबईतील सर्व परिमंडळात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

- हरविलेल्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी प्रमाणित कार्यपध्दती (SOP) तयार करण्यात आलेली आहे.
- प्रत्येक पोलीस ठाण्यात विशेष निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे.
- बृहन्मुंबईतील अपर पोलीस आयुक्त यांचे अखत्यारित प्रादेशिक नियंत्रण कक्षास मिसींग डेस्क कार्यान्वित करण्यात आलेला आहे.
- हरविलेले मुले/ मुली/ महिला यांची विशेष शोध मोहिम ऑपरेशन मुस्कान ११, ऑपरेशन रियुनाईट राबविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.